जळगाव २३, (प्रतिनिधी) : ट्रान्सजेंडर व्यक्तींबद्दल समाजात संवेदनशिलता अधिक वाढीला लागण्याची गरज असून शासकीय पातळीवर या व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरु असले तरी समाजाला आणि त्यासोबतच माध्यमांना पुढाकार घ्यावा लागणार आहे असे प्रतिपादन कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळा आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल डिफेन्स, मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टीस ॲण्ड एम्पावरमेंट, नवीदिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. २३ सप्टेंबर रोजी 'ट्रान्सजेंडर आणि माध्यमांची भूमिका' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. याकार्यशाळेचे उद्घाटन करतांना कुलगुरू प्रा. माहेश्वरी बोलत होते. यावेळी दै. लोकमतचे संपादक किरण अग्रवाल, दै. दिव्य मराठीचे संपादक दीपक पटवे, दै. देशदूतचे संपादक हेमंत अलोने, दै. देशोन्नतीचे आवृत्ती प्रमुख मनोज बारी यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

प्रा. माहेश्वरी म्हणाले की, अनुवंशिक, जैविक अथवा हार्मोनिक कारणांमुळे एखाद्या व्यक्तीला ट्रान्सजेंडर समजले जाते. या व्यक्तींना समाजात चांगली वागणून मिळत नसल्यामुळे व रोजगाराची साधने उपलब्ध होत नसल्यामुळे अप्रिय कामात सहभाग घ्यावा लागतो. सुसंस्कृत समाजाची पहिली अट सर्व घटकांना समान संधी ही असली पाहिजे. त्यादृष्टीकोनातून ट्रान्सजेंडर व्यक्तींबद्दल समाजात संवेदनशीलता अधिक प्रमाणात वाढवावी लागेल. काही कायदे करून सरकार प्रयत्न करीत आहे मात्र समाजातही हा बदल घडायला हवा यामध्ये माध्यमांचा पुढाकार अधिक हवा असे ते म्हणाले.

**माध्यमे बदलताय :** ट्रान्सजेंडर व्यक्तींविषयी प्रसारमाध्यमे सजग झाली असून पुर्वीपेक्षा यावर्गाच्या बातम्यांना प्रसिध्दी दिली जात आहे. मात्र माध्यम आणि ट्रान्सजेंडर यांच्यात संवाद वाढायला हवा असा सूर संपादकांच्या मनोगतांमध्ये व्यक्त झाला. दीपक पटवे म्हणाले की, ट्रान्सजेंडर व्यक्तींचे काही व्हिडीओ समाज माध्यमांमध्ये जाणीवपुर्वक पसरवून नकारात्मक प्रतिमा तयार केली जाते. या व्यक्तींद्दल पुरेसे ज्ञान अथवा माहिती दिली जात नाही. माध्यम आणि ट्रान्सजेंडर व्यक्ती यांच्यातील संवाद वाढायला हवा. शाळेत ट्रान्सजेंडर विषयी एखादा धडा पाठ्यपुस्तकात असायला हवा. माध्यमांमध्ये आता पुर्वीसारखी परिस्थिती राहिली नसली तरी खूप मोठा बदल झालेला नाही मात्र त्यांच्या सकारात्मक बातम्या वृत्तपत्रांमध्ये येवू लागल्या आहेत. या बातम्यांना पुरेशी जागा मिळायला हवी असेही पटवे म्हणाले. किरण अग्रवाल म्हणाले की,माणूस म्हटले की, पुरूष आणि स्त्री हे दोन वर्ग बघितले जातात. स्त्रीयांनाच माणुस म्हणून जिथे वागणूक मिळत नाही तिथे ट्रान्सजेंडर व्यक्तीला माणूस म्हणून कसे बघणार त्यामुळे अगोदर माणून केंद्री होता आले पाहिजे. पुर्वापार चालत आलेली मानसिक संकल्पना बदलावी लागेल. समाजातील सगळया घटकांचे श्वास टिपण्याचे काम वृत्तपत्रे करीत असतात. ट्रान्सजेंडर यांच्या सकारात्मक बातम्या आता प्रसिध्द होवू लागल्या आहेत. हे सांगतांना अग्रवाल यांनी काही बातम्यांची उदाहरणे दिली. हेमंत अलोने यांनी ट्रान्सजेंडर वर्ग हा समाज माध्यमांकडे वळला आहे, कारण मुख्य प्रवाहातील माध्यमे त्यांना सूमजून घ्यायला कमी पडतो आहे. अशी खंत व्यक्त करून माध्यमांनी त्यांच्यापर्यंत आणि त्यांनीही माध्यमांपर्यंत पोहचण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. मनोज बारी यांनी ट्रान्सजेंडर व्यक्तींच्या प्रबोधनाची गरज आहे. मुख्य प्रवाहात त्यांना आणण्यासाठी

मसमजावून सांगितले तर ते समजून घेतात. असे सांगून वृत्तपत्रांची भूमिका या वर्गाबद्दल सकारात्मक राहीली आहे. असे प्रतिपादन केले.

माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक तथा मुख्य निमंत्रक प्रा. सुधीर भटकर यांनी प्रास्ताविक केले. सह निमंत्रक डॉ. गोपी सोरडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अॅड सूर्यकांत देशमुख यांनी आभार मानले. गणितशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.के.एफ. पवार यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. विविध सत्रांचे सूत्रसंचालन तुलसी सुशीर व अमोल पाटील यांनी केले.

**बातमी नं. २**

जळगाव २३, (प्रतिनिधी) : संशोधक विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक रोजगार क्षमता कौशल्यासह सुसज्ज करून त्यांची शैक्षणिक व व्यावसायिक क्षमता वाढीला लागावी या दृष्टीकोनातून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बौध्दीक संपदा हक्क कक्षाच्या वतीने आयोजित आयराईज क्षमता निर्माण कार्यशाळेला सोमवार दि. २३ सप्टेंबर रोजी प्रारंभ झाला.

दि. २५ सप्टेंबरपर्यंत ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये १०० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत. आयसर पुणे यांच्या सहकार्याने ही कार्यशाळ होत आहे. सोमवारी विज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य एस.एस. राजपूत यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी आयसीटी, मुंबई येथील अॅडजंक्ट प्रोफेसर दिलीप उदास, इनोव्हेशन अॅण्ड इनव्हेंशन कन्सलटन्ट आशुतोष प्रचंड, बौध्दीक संपदा हक्क कक्षाचे चेअर प्रोफेसर प्रा.डी.जी. हुंडीवाले, आयराईजच्या व्यवस्थापक प्रिती निमा, समन्वयक वैष्णवी कुलकर्णी, प्रा. व्ही.व्ही. गिते उपस्थित होते.

यावेळी बोलतांना प्राचार्य राजपूत यांनी पीएच.डी.संशोधक विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रा.हुंडीवाले यांनी नाविन्यपूर्ण संशोधन व्हावे यासाठी आयराईज, पुणे यांच्या वतीने पुढाकार घेतला जात असून विद्यार्थ्यांमध्ये क्षमता विकसन व्हावे यासाठी पहिल्या टप्प्यातील ही कार्यशाळा होत असल्याचे सांगितले. डॉ. प्रिती निमा यांनी आयराईजच्या उपक्रमांविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सारंग बारी यांनी केले, मयुर पाटील यांनी आभार मानले.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २३ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी



## जनसंपर्क विभाग

जळगाव २३, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रा.से.यो. विभागाच्या वतीने रविवार दि. २२ सप्टेंबर रोजी जळगाव शहरातील मध्यवर्ती बसस्थानकात 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमांतर्गत स्वच्छता अभियान घेण्यात आले.

युवक व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली, रा.से.यो. मंत्रालय कक्ष उच्च व तंत्रशिक्षण विभाग मुंबई व प्रादेशिक संचालनालय, पुणे यांच्या आदेशान्वये हे अभियान घेण्यात आले. शहरातील विविध महाविद्यालयांमधील १७५ रा.से.यो. स्वयंसेवक या अभियानात सहभागी झाले होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्राचार्य एल.पी. देशमुख, प्राचार्य राकेश चौधरी, प्राचार्य चाँद खान, आगार प्रमुख श्री. तिवारी, मनिष पाटील, जिल्हा समन्वयक डॉ. दिनेश पाटील, विभागीय समन्वय राजु गवारे उपस्थित होते. या सर्वांनी स्वच्छता अभियानात प्रत्यक्ष भाग घेतला. धनाजी नाना प्रबोधिनी समाजकार्य महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर करून स्वच्छतेचा संदेश दिला. त्यानंतर जी.एस. मैदान, नेहरू पुतळा परिसर, गोलाणी मार्केट, गांधी उद्यान, जिल्हा न्यायालय येथेही अभियान राबवून प्लॅस्टीक गोळा करून महानगर पालिकेकडे सुपूर्द करण्यात आले. कार्यक्रमाधिकारी डॉ. राजू पाटील, प्रा.विशाल देशमुख, प्रा. तन्वीर खान, प्रा. भारती गायकवाड, प्रा. शीला राजपूत, प्रा. आकाश बिवाल, प्रा.रफिक शेख, प्रा. हुंवटे, रा.से.यो. संचालक प्रा. सचिन नांद्रे व कर्मचारी उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव २३, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केसीआयआयएल इन्क्युबेशन केंद्राच्या पाचवा वर्धापन दिन कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच साजरा करण्यात आला.

यावेळी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, संचालक छबिराज राणे, डॉ. राजेश जावळेकर, प्रा. भुषण चौधरी, डॉ. विकास गिते आदी उपस्थित होते. प्रा. भुषण चौधरी यांनी पाच वर्षाच्या इन्क्युबेशन केंद्राच्या वाटचालीचा आढावा घेतला. डॉ. राजेश जावळेकर यांनी केंद्राचे उद्दीष्टे सांगितले. कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी नाविन्यपूर्ण संकल्पनांना अनुकूल वातावरण निर्माण करून उद्योजक घडविण्याची प्रक्रिया या केंद्रामार्फत केली जात असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. स्टार्टअपच्या पाठीशी विद्यापीठ नेहमीच उभे राहील अशी ग्वाही त्यांनी दिली. या कार्यक्रमात स्टार्टअप उद्योगांचे सादरीकरण करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी सागर पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व आभार मानले. दर्पण साळुंखे, देवेंद्र काळे, योगेश पाटील, विशाल पाटील आणि विजय शेले यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ — दिनांक: २३ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी